नि.फौ.ख.क्र.३२७४/२०२२
सरकार वि. मो. जाकीर वगैरे
निशाणी क्र. ५१

**सरकारतर्फे साक्षीदार क्र. ६ यांची शपथेवर सरतपासणी सुरू**

| | | |
|---|---|---|
| मी याद्वारे प्रतिज्ञापूर्वक निवेदन करतो की, | | |
| नाव | – | मो. जाहीद कुरेशी मो. शफी |
| वय | – | ४२ वर्षे |
| धंदा | – | खाजगी |
| राहणार | – | गडडीगोदाम, नागपूर |

**सरतपास सरकार पक्षातर्फे सहा. सरकारी अभियोक्ता श्रीमती संगीता गोगे यांच्याकडून**

१. पोलीसांनी मला सायबर सेलच्या ऑफीसमध्ये सिव्हील लाईन्स येथे पंच म्हणुन बोलावले होते. पोलीसांनी माझ्यासमक्ष ब्राउन कलरच्या पॉकीटमधुन आयबॉल कंपनीचा पेनड्राईव्ह काढला आणि त्याबाबत पंचनामा केला. सायबर सेलच्या अधिका–यांनी पेनड्राईव्हची हॅशव्हॅल्यु काढली आणि परत पेनड्राईव्ह पॉकीटात ठेवला आणि त्यावर माझी आणि दुसरा पंच साक्षीदार आशीष मानवटकर याची सही घेतली. साक्षीदारास दिनांक ०१.०६.२०२२ रोजीचा पंचनामा दाखवला. त्यावर माझी सही आहे. त्यातील मजकुर खरा व बरोबर आहे. सदर पंचनामा **नि.क्र.५२** वर दाखल आहे.

**साक्षीदाराचा उलटतपास आरोपी क्र.१ ते ४ तर्फे वकील श्री शेख सबाहत** –

२. फिर्यादी माझा सख्खा भाऊ आहे. पोलीसांनी मला पंच म्हणुन काम करण्याकरीता लेखी नोटीस दिली नव्हती. पंचनामा नि.क्र.५२ मध्ये पंचनामा माझ्यासमक्ष करण्यात आला असे नमुद आहे. पंचनाम्यात 'पंचनामा मला वाचुन दाखवण्यात आला' असे नमुद नाही. हे म्हणने खरे नाही की, पंचनामा माझ्यासमक्ष केला नाही म्हणुन पंचनामा मला वाचुन दाखवण्यात आला' असे नमुद नाही. हे म्हणने खरे नाही की, आयबॉल कंपनीचा पेनड्राईव्ह हे मी खोटे सांगतो आहे. हे म्हणने खरे

आहे की, 'ब्राउन कलरच्या' पॉकीटातुन पेनड्राईव्ह काढला असे पंचनाम्यात नमुद नाही. महीला पोलीस हवालदार सिमा टेकाम हया सायबर सेलच्या कर्मचारी होत्या. हे म्हणने खरे नाही की, फिर्यादी माझा भाऊ असल्यामुळे मी खोटी साक्ष देत आहे. हे म्हणने खरे नाही की, पंचनामा नि.क्र. ५२ खोटा तयार केला आहे.

**फेरतपास काही नाही**

श्रवणोत्तर स्वीकृत

माझे समक्ष,

(श्रीमती. एस.टी. दंडे)
मुख्य न्यायदंडाधिकारी, नागपूर

नागपूर
दिनांकः–०९.०७.२०२४